# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३७९/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| डॉ.वैशाली पंकज वीर, रा.गुरुकृपा अभ्यासिका, रामकृष्ण नगर, १ ला मजला, ई विंग, पोर्णिमा टॉकीज कंपाऊंड, मारुती शोरुमच्या बाजुला, सिंडीगेट, कल्याण(प), ता.कल्याण, जि.ठाणे-४२१३०१ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग(माध्यमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालय, नाशिक, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, त्र्यंबक नाका, नाशिक, ता.जि.नाशिक.४२२००१ | शिक्षणाधिकारी(माध्यमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालय, नाशिक, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, त्र्यंबक नाका, नाशिक, ता.जि.नाशिक.४२२००१ |

**सुनावणी दिनांक — ११/०२/२०२५**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| ऑनलाईन उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | उपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन दिलेल्या माहिती व्यतिरिक्त पुनश्च: माहितीचा शोध घेण्याबात आदेश दिले आहे तरी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिलेली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६/११/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/११/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन-२०१३ ते सन-२०२० अखेर.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** सुर्या शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित १) माध्यमिक विद्यालय कळवण, इ.५ वी ते ७ वी ऑनलाईन मुल्यांकन प्रस्तावाची छायांकित प्रत व सदर वर्गाचे मुल्यांकन गुणदान तक्ता.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक, यांनी दि.२४/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये इ.५ वी ते ७ वी वर्गाचे गुणदान केले जात नाही. तथापी सदरची माहिती या कार्यालयाकडे दिसुन येत नाही असे अपिलार्थी यांना अवगत केले आहे.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७/१२/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालय, नाशिक, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, त्र्यंबक नाका, नाशिक, ता.जि.नाशिक. यांनी दि.१०/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: याबाबत खात्री करुन अपिल अर्जदार यांना १५ दिवसात वस्तुस्थिती अवगत करावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढले आहे.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

**(१) अपिलार्थी-** जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नाही. प्रथम अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

**(२) विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी-** अपिलार्थी यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिक्षण/माध्य-१०/मा.अ./६८९०/२०२१ दिनांक २४/१२/२०२१ अन्वये इ ५ वी ते ७ वी वर्गाचे गुणदान केले जात नाही असे कळविले आहे. दि.१०/०२/२०२२ चे प्रथम अपिल सुनावणीत अपीलीय अधिकारी यांनी अपील अर्जदार यांना १५ दिवसांत वस्तुस्थिती कळवावी असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार दि.०२/०३/२०२२ चे पत्रानुसार इ. ५ वी ते ७ वी वर्गाचे गुणदान केले जात नसल्याने गुणदान तक्ता उपलब्ध करुन देता येत नाही असे अवगत केल्याचे स्पष्ट केले.

**(३) विद्यमान प्रथम अपिल अधिकारी यांचे प्रतिनिधी-** अपिलार्थी यांच्या प्रथम अपिल अर्जावर दि.१०/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: याबाबत खात्री करुन अपिल अर्जदार यांना १५ दिवसात वस्तुस्थिती अवगत करावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढले असल्याचे स्पष्ट केले.

**६. निष्कर्ष –**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते.

(२) तत्कालीन प्रथम अपिल अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर दि.१०/०२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: याबाबत खात्री करुन अपिल अर्जदार यांना १५ दिवसात वस्तुस्थिती अवगत करावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढले असल्याचे दिसून येते.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशा नुसार अपिलार्थी यांना दि.०२/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुर्या शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय कळवण, इ.५ वी ते ७ वी ऑनलाईन मुल्यांकन प्रस्तावाची प्रत सदर वर्गांचे मुल्यांकन गुणदान तक्ता याची माहिती मागणी केलेली आहे. त्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिक्षण/माध्य-१०/मा.अ./६८९०/२०२१ दिनांक २४/१२/२०२१ अन्वये आपणास यापुर्वी इ ५ वी ते ७ वी वर्गाचे गुणदान केले जात नाही असे कळविले आहे. दि.१०/०२/२०२२ चे प्रथम अपिल सुनावणीत अपीलीय अधिकारी यांनी अपील अर्जदार यांना १५ दिवसांत वस्तुस्थिती कळवावी असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार इ.५ वी ते ७ वी वर्गाचे गुणदान केले जात नसल्याने गुणदान तक्ता उपलब्ध करुन देता येत नाही असे अवगत केल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१३७९/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. ५८०३९

14 JUL 2025